# बलात्कारपीडितेचे ‘प्रमाणक’ नाकारताना

गोवा येथील सत्र न्यायालयाने एका निकालाद्वारे ‘तहलका ‘मासिकाचे माजी मुख्य संपादक तरुण तेजपाल यांची एका कनिष्ठ सहकारी महिलेवर लैंगिक दडपशाही करून बलात्कार करण्यासंदर्भातील सर्व आरोपांमधून निर्दोष मुक्तता केली. यासंदर्भात बलात्कारपीडित व्यक्तीच्या म्हणण्यास पुष्टी देणाऱ्या परपोषक पुराव्याचा अभाव आणि तिच्या साक्षीतील अंतर्विरोध व वगळलेल्या बाबी यातून तयार झालेली अविश्वसनीयता दर्शवून न्यायालयाने तेजपाल यांची मुक्तता केली.

या ५२७ पानी निकालात न्यायालयाने पीडितेचे पूर्वजीवनातील लैंगिक वर्तन आणि सदर घटनेनंतर लोकांच्या नजरेत स्वत:बद्दल शरम वाटत असल्याच्या जाणिवेचा अभाव यावरच प्रश्न उपस्थित केला आहे. ही बाब अपर्णा भट्ट वि. मध्य प्रदेश शासन या प्रकरणासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने मार्च २०२१मध्ये दिलेल्या निकालाचे उल्लंघन आहे. या निकालात बलात्काराच्या प्रकरणात गैरलागू असलेल्या पीडितेच्या वर्तनाबाबत टिप्पणी करण्यापासून न्यायालयाने स्वत:ला दूर ठेवावे असे गृहीत धरले आहे. तसे पाहता भारतीय पुरावा कायद्याच्या विभाग ८मध्ये आरोपी अथवा

बळी ठरलेल्या व्यक्तींचे केसशी संबंधित आधीचे आणि नंतरचे वर्तन लक्षात घेण्याची सोय असली तरी बऱ्याचदा त्याचा वापर लैंगिक अत्याचारित पीडितेकडून अपेक्षित 'प्रमाण' वर्तनाच्या तुलनेत दिसून येणाऱ्या तिच्या प्रतिसादाचे मोजमाप करून पीडितेची विश्वासार्हता जोखण्यासाठी केला जातो. हे लैंगिक अत्याचारित पीडितेकडून अपेक्षित केले जाणारे 'प्रमाण' वर्तन अपराधाचे निराकारण करण्यामध्ये 'गुन्ह्याच्या आधी, दरम्यान आणि नंतर तिच्या वर्तनावर अनावश्यक भर देते. बलात्काराच्या प्रकरणात शारीरिक संमतीचे अनुमान हे इतर अनेक बाबींसोबतच संभोगादरम्यान झालेला स्राव, शारीरिक जखमा किंवा झटापटीच्या खुणांचा अभाव या आधारे कशा रीतीने काढले गेले आहे, हे अभ्यासकांनी नोंदवले आहे. नुकतेच कर्नाटक उच्च न्यायालयाने बलात्कार झाल्यानंतर पीडितेने शांत झोपी जाणे ही बाब भारतीय स्त्रीला शोभून दिसत नाही आणि आपल्या बायका बलात्कार झाल्यावर जशा चिडून उठतात, त्याच्याशी मेळ खात नाही असे मत ग्राह्य धरले आहे. पीडितेकडून अपेक्षित केले जाणारे हे 'प्रमाण' वर्तन अशा प्रकरणात कोणत्याही अनुभवजन्य पुराव्यावर आधारित नसून तथाकथित 'भारतीय मूल्यां'वर आधारित आहे, ही गोष्ट स्पष्टच होते.

हिंसाग्रस्त आणि पीडित स्त्रियांबाबतची हे न्यायालयीन रचित सातत्याने 'स्वाभिमानी स्त्री', 'पवित्र भारतीय स्त्री', 'प्रतिष्ठित व सज्जन स्त्री' अशा स्त्रियाच विश्वासार्ह व पत असणाऱ्या पीडिता असू शकतात अशी चौकट आखते, ज्यातून न्याय मिळण्यास खऱ्या अर्थाने 'लायक' असलेल्या 'आदर्श पीडिता'ची संकल्पना

घडविली जाते. ‘भारतीय मूल्यां’चा संदर्भ देत अशी आदर्श पीडितत्वाची प्रमाणके घडविताना न्यायालये हे विचार मूलत: आदर्श स्त्रीत्वाशी संबंधित मनूच्या ब्राह्मणी संहितेतून घेत आहेत.

मनुस्मृतीमध्ये लिहून ठेवल्याप्रमाणे ब्राह्मणी पितृसत्ता स्पष्टपणे निर्देशन करते की, जी स्त्री स्वत:चे मन, वाचा व शरीरावर ताबा ठेवते आणि कधीही एकनिष्ठतेला तडा जाऊ देत नाही...सज्जन लोक अशा स्त्रीलाच चांगली (नीतिमान) स्त्री म्हणतात. द्विज-सवर्ण पुरुषांद्वारे बहुजन स्त्रियांवरील अत्याचाराला मान्यता देत असतानाच द्विज-सवर्ण स्त्रियांच्या ‘पावित्र्य व सत्वशीलपणा’चे जतन करून ब्राह्मणी वर्चस्व टिकवून ठेवले जाते. द्विज-सवर्ण स्त्रीला तिच्या खाजगी वर्तुळाच्या बंधनातच ठेवले जात असल्याने साहजिकच न्यायालय म्हणते तशा आदर्श पीडितेच्या संकल्पनेचेच ती अनुसरण करत असते. अशा वेळी जेव्हा पीडितेचे सार्वजनिक व्यक्तिमत्व ब्राह्मणी चौकटीत चपखल बसत नाही, तेव्हा ती कोर्टाच्या नजरेत आदर्श पीडिता ठरत नाही; हीच बाब सध्या चर्चेचा विषय ठरलेल्या कोर्टाच्या निर्णयातून दिसून येते. ज्या स्त्री-समूहांना नेहमीच असुरक्षित वातावरणाचा सामना करावा लागतो वा त्यांच्या जातीच्या स्थानावरून त्या सत्त्वशील व विधीवत शुद्ध नसतात अशा समजेतून पाहिले जाते अशा बहुजन स्त्रिया आणि किन्नर हे कोर्टाच्या नजरेत विश्वासार्ह असलेल्या आदर्श पीडितेच्या चौकटीत बसणे अक्षरश: अशक्यच.

परिणामी बहुजन स्त्रिया आधुनिक फौजदारी न्यायव्यवस्थेतून आपोआपच बाद ठरवल्या जातात. उदा. तुकाराम वि. महाराष्ट्र शासन या केसमध्ये मथुरा नामक आदिवासी मुलीवर पोलीस

कोठडीत पोलिसांनी सामूहिक बलात्कार केल्याची घटना घडली. तेव्हा सर्वोच्च न्यायालयाने या आधारावर सर्व आरोपी पोलिसांची निर्दोष मुक्तता केली की, सदर मुलीला अनेकांशी लैंगिक संबंध ठेवण्याची सवय असून, बलात्कार होताना तिने सुटकेसाठी मदतीची याचना केली नाही तसेच तिच्या शरीरावर प्रतिकार केल्याच्या जखमा व खुणा आढळल्या नाहीत. बलात्काराआधी आणि बलात्कारानंतरचे मथुराचे वर्तन, तिच्या जातीचे उतरंडीतील स्थान या बाबी कोर्टाच्या नजरेतील आदर्श पीडितेचे वर्तनात बसत नाहीत. अशाच प्रकारे, भंवरी देवीच्या केसमध्ये, सत्र न्यायालयाने उच्चजातीय पुरुष निम्न जातीच्या स्त्रीवर बलात्कार करूच शकत नाही या आधारावर आरोपी पुरुषांची सुटका केली. कोर्टाच्या नजरेत भंवरी देवी ही 'निम्न जातीय' स्त्री असल्याने 'आदर्श पीडिता' नव्हती तसेच उच्च जातीय पुरुषदेखील 'आदर्श गुन्हेगार' नव्हते. खैरलांजी जातीय हत्याकांडाच्या प्रकरणात वरचढ कुणबी जातीतील पुरुषांकडून संपूर्ण दलित कुटुंबाची हत्या करण्यात आली, त्यातील आई आणि मुलीचा मृतदेह नग्न व विटंबना केलेल्या अवस्थेत आढळला; परंतु ही विटंबना बलात्कार नाही तर पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने करण्यात आली, या युक्तिवादाच्या आधारावर कोर्टात बलात्काराचे आरोप सिद्ध होऊ शकले नाहीत.

आधुनिक फौजदारी न्यायव्यवस्थेद्वारे आदर्श पीडिता ठरविण्याबाबतचे केले गेलेले हे रचित पीडितेला व्यक्तित्व आणि मानवतापूर्ण वागणूक नाकारून मनूच्या कायद्याने जे केले तेच काम करते. तेजपाल प्रकरणातील निकालाच्या पार्श्वभूमीवर

आता हे विचारणे अत्यावश्यक झाले आहे की, जर अश्या प्रकारे आपली न्यायव्यवस्था पीडित व्यक्तीची विश्वासार्हता पडताळण्यासाठी ब्राह्मणी पितृप्रधान चौकटीतील विचारांची उसनवारी करत असेल तर राज्यघटनेने हमी दिलेल्या व्यक्तित्वाचे रक्षण ती कसे करणार?

●

**दिशा वाडेकर**

वकील, सर्वोच्च न्यायालय, वास्तव्य - पुणे

ईमेल- dmwadekar@gmail.com

(प्रस्तुत टिपण हे ५ जून २०२१च्या इपीडब्ल्यूमध्ये प्रसिद्ध झालेले असून साभार अनुवाद. अनुवाद : **गणेश मेरगू**)

परिवर्तनाचा
वाटसरू

इथेही उपलब्ध

अथर्व पब्लिकेशन्स

तळमजला, ओम हॉस्पिटल,
अँग्लो उर्दू हायस्कूलजवळ, दत्त कॉलनी,
जळगाव-४२५००१
दू. ०२५७-२२३९६६६

माणगावकर ए

५३८ अ, शनिवार पेठ, किबे लक्ष्मी थिएटरसमोर,
अप्पा बळवंत चौक,
पुणे ४११०३०
भ्र. ७०२००४४६५५